तरुण भारत संवाद

# हळबे महाविद्यालयात ग्रंथालय दिन साजरा

**दोडामार्ग :** वाचनामुळे प्रत्येकाला आपली गुणवत्ता व क्षमता वाढविता येते, ग्रंथ हेच गुरू असतात, यामुळेच आयुष्याला एक नवी दिशा मिळत असते. म्हणून दर्जेदार पुस्तकांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या हेतूने लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयातर्फे पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. यू. दरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. दिलीप बर्वे, प्रा. एस. एन. जाधव, प्रा. रामकिस्न मोरे, प्रा. एस. एन. खडपकर, प्रा. एस. एस. पाडगावकर, प्रा. डॉ. आर. एस. इंगळे, प्रा. प्रीती प्रसादी आदी उपस्थित होते. या प्रदर्शनात नावाजलेल्या लेखकांचे चरित्र, आत्मचरित्र, कथा, कादंबऱ्या, कवितासंग्रह, नाटके, स्पर्धा परीक्षा व संदर्भग्रंथ मांडण्यात आले होते.प्रदर्शन यशस्वीतेसाठी ग्रंथपाल प्रा. रामकिस्न मोरे यांनी मेहनत घेतली.

मंगळवार, २७ ऑगस्ट २०१९ news.sindhu@tbsanwad.com